सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र राज्य इंन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे**
**(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)**
**४१२-क,के एम, मुन्शी मार्ग, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.**
**फोन नं.०२०-२५६७७१८९** **इ मेल- office.msihmct@gmail.com**


---

जा. क्र. मराआयएचएमसीटी/विवि/२०२६/ ३१ दि. 12 JAN 2026

**महत्वाचे :**

## सूचना

संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, **mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावर सर्व शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेकरीता प्रक्रिया चालू आहे. संस्थेतील द्वितीय व तृतीय वर्षातील सर्व विद्यार्थ्यांनी आपण अगोदरच्या वर्षात भरलेला अर्ज नूतनीकरण करून चालू वर्षाकरीता अर्ज करणे आवश्यक आहे.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मध्ये नविन प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी या संकेतस्थळावर नव्याने नोंदणी करून आपल्या प्रवर्गाप्रमाणे राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना(**EBC**), डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना अल्पसंख्याक शिष्यवृत्ती **SC/ST/OBC/SBC/VJNT/NT's** प्रवर्गाकरीता शिष्यवृत्ती, अर्ज भरावयाचा आहे. सदर संकेतस्थळावर सर्व माहिती (संकेतस्थळावर अर्ज कसा भरावा, आवश्यक असणारी प्रमाणपत्रे, मिळणारे आर्थिक लाभ, कोणत्या प्रवर्गासाठी कोणती शिष्यवृत्ती लागू आहे, इत्यादी) उपलब्ध आहे.

सर्व विद्यार्थ्यांना पूनश्चः कळविण्यात येते की, जर आपण दिलेल्या मुदतीत उपरोक्त संकेतस्थळावर अर्ज भरला नाही किंवा काही कारणास्तव आपला अर्ज पारीत झाला नाही, तर प्रवेशाच्या वेळी आपणास देण्यात आलेल्या संपूर्ण शिक्षण शुल्काच्या दिलेली सवलतीची वसूली करण्यात येईल, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. ज्या—ज्या शैक्षणिक वर्षात सवलत दिलेली असेल त्या—त्या वर्षात शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे अनिवार्य आहे.

- **या बाबत विद्यार्थ्यांना वांरवांर सूचित करूनही खुप कमी विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा अर्ज भरले आहे. तरी उर्वरीत सर्व पात्र विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत शिष्यवृत्तीचा अर्ज भरला नाही तर वर नमूद केल्याप्रमाणे शिक्षण शुल्काची रक्कम वसुल करण्यात येईल यांची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
- **तसेच ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज Srutiny मध्ये Sent Back to applicant Login परत पाठविण्यात आलेले आहे. त्या विद्यार्थ्यांनी आवश्यक ती कार्यवाही करून अर्ज परत सादर करायचा आहे.**

(डॉ. अपर्णा आशिष देशपांडे)
प्र. प्राचार्य,
महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयूट ऑफ
हॉटेल मॅनेजमेंट अँन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे

**प्रत माहितीस्तव** :- १. संस्थेतील सर्व अधिव्याख्याते यांना विद्यार्थ्यांना अवगत करणेकरीता परिभ्रमणार्थ अग्रेषित तसेच नोटीस बोर्डवर प्रदर्शित करणेकरीता.

२. प्रोग्रामर यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेकरीता.